# यशोदा शिक्षण प्रसारक मंडळ, सातारा

नोंदणी क्र. महाराष्ट्र १३०५६/सातारा दि. २०/०९/२००९

ऑफिस - स. नं. २४२/१, एन. एच. - ४८, वाढे, ता., जि. सातारा - ४१५०११ (महाराष्ट्र)

फोन/फॅक्स : ०२१६२ - २७१२३८ / ३९ मो. ९१७२२२०७७५ / ९०४९८००८०८

E-mail :- yspmadmin@yes.edu.in, Website : www.yes.edu.in

| डॉ. दशरथ सगरे | डॉ. अजिंक्य सगरे | सौ. साधना सगरे | डॉ. गणेश सुरवसे |
|---|---|---|---|
| संस्थापक अध्यक्ष | उपाध्यक्ष | सचिव | कुलसचिव |


जावक क्र. YSPM/ADMIN/150/2026-27 दिनांक : 01/10/2026

## नोटीस

सर्व शाखाप्रमुखांना सूचित करण्यात येते की, महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री यांच्या जयंतीनिमित्त दिनांक ०२ ऑक्टोबर २०२६ रोजी देशभर स्वच्छता अभियान राबविण्यात येते.त्यानुषंगाने यशोदा इन्स्टिट्यूट्समधील सर्व शाखांमध्ये दिनांक ०२ ऑक्टोबर २०२६ रोजी सकाळी ०९.०० ते सकाळी ११.०० वाजेपर्यंत खालील मार्गदर्शक सूचनांनुसार स्वच्छता अभियान प्रभावीपणे राबविण्यात यावे. अभियानाच्या अंमलबजावणीची निरीक्षण करण्यासाठी संस्थेची गठीत समिती सकाळी ०९.०० ते ११.०० वाजे. दरम्यान शाखेस भेट देऊन अभियानाची निरीक्षण करून त्याबाबतचा आवश्यक अहवाल संस्थेस सादर करेल. सदर स्वच्छता अभियान उत्कृष्ट व प्रभावीपणे राबविणाऱ्या शाखेचा संस्थेच्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमामध्ये पारितोषक देऊन विशेष सत्कार करण्यात येणार आहे.

### स्वच्छता अभियान राबविण्याबाबत मार्गदर्शक सूचना

१ आपल्या शाखेतील सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर सेवक दिनांक ०२ ऑक्टोबर २०२६ रोजी सकाळी ०९.०० ते सकाळी ११.०० वाजेपर्यंत शाखेमध्ये उपस्थित राहून स्वच्छता अभियानामध्ये सक्रिय सहभाग नोंदवावा.

२ शाखाप्रमुख व शिक्षकांनी विद्यार्थ्यांच्या सहभागाने आपल्या शाखेतील वर्गखोल्या, प्रयोगशाळा व इतर शैक्षणिक परिसराची स्वच्छता करावी. यामध्ये पुढील बाबींचा समावेश करावा :

- **वर्गखोल्या व प्रयोगशाळांची स्वच्छता करणे.**
- **शैक्षणिक साहित्य व्यवस्थित व नीटनेटकेपणाने मांडणे.**
- **बेंच, डेस्क व इतर फर्निचर योग्य ठिकाणी ठेवणे.**
- **संगणक व इतर इलेक्ट्रॉनिक उपकरणांची स्वच्छता करणे.**
- **प्रयोगशाळेतील उपकरणे व साहित्य व्यवस्थितपणे मांडणे.**
- **निरुपयोगी झालेले साहित्य स्वतंत्रपणे वर्गीकृत करून सुव्यवस्थित ठिकाणी ठेवणे.**
- **परिसरातील कचरा संकलित करून योग्य पद्धतीने त्याची विल्हेवाट लावणे.**
- **कार्यालयीन परिसर, जिने, कॉरिडॉर, प्रवेशद्वार व परिसराची स्वच्छता करणे.**
- **स्वच्छता व कचरा व्यवस्थापनाबाबत विद्यार्थ्यांमध्ये जनजागृती करणे.**

यशोदा शिक्षण प्रसारक मंडळ महा १३०५६ सातारा

३ शाखाप्रमुख व शिक्षकांनी विद्यार्थ्यांच्या सहभागाने आपल्या शाखेमध्ये पुढील स्वच्छता जनजागृतीसाठी उपक्रम राबविणे . ( किमान २ उपक्रम अनिवार्य असेल )

- **स्वच्छता जनजागृती व्हिडिओ – विद्यार्थ्यांनी तयार केलेले ५ मिनिटांचे लघु व्हिडिओ.** (अनिवार्य )
- **स्वच्छता शपथ – सर्व विद्यार्थी, शिक्षक व सेवकांची सामूहिक शपथ.**
- **पोस्टर व घोषवाक्य स्पर्धा – "स्वच्छ परिसर – सुंदर परिसर" विषयावर.**
- **पथनाट्य – स्वच्छता, प्लास्टिकमुक्त परिसर व कचरा व्यवस्थापनावर.**
- **जनजागृती फलक – परिसरात आकर्षक स्वच्छता संदेशांचे फलक लावणे.**
- **स्वच्छता सेल्फी पॉइंट – विद्यार्थ्यांसाठी स्वच्छता संदेशासह आकर्षक पॉइंट.**

४ प्रत्येक शाखाप्रमुखाने स्वच्छता अभियानाची प्रभावी अंमलबजावणी सुनिश्चित करून अहवाल, छायाचित्रे, ५ मिनिटांचे लघु व्हिडिओ व आवश्यक माहिती संस्थेकडे सादर करावी.

**सर्व शाखाप्रमुखांनी वरील सूचनांची काटेकोरपणे अंमलबजावणी करावी.**

यशोदा शिक्षण प्रसारक मंडळ, सातारा महा १३०५६

कुलसचिव
यशोदा शिक्षण प्रसारक मंडळ, सातारा